महसूल विभागाच्या अधिसूचित सेवा

अ.क्र	लोकसेवेचा तपशील	लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा (दिवस)	पदनिर्देशित अधिकाऱ्याचे पदनाम	प्रथम अपिल अधिकाऱ्याचे पदनाम	द्वितीय अपिल अधिकाऱ्याचे पदनाम
१	वय, राष्ट्रीयत्व आणि अधिवास प्रमाणपत्र	१५	तहसिलदार	उपविभागीय अधिकारी	अप्पर जिल्हाधिकारी
२	जातीचे प्रमाणपत्र	२१	उपविभागीय अधिकारी/ उपजिल्हाधिकारी	अप्पर जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी
३	उत्पन्न प्रमाणपत्र	१५	नायब तहसिलदार	तहसिलदार	उपविभागीय अधिकारी
४	नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र	२१	उपविभागीय अधिकारी	अप्पर जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी
५	तात्पुरता रहिवास प्रमाणपत्र	७	तहसिलदार	उपविभागीय अधिकारी	अप्पर जिल्हाधिकारी
६	ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र	७	तहसिलदार	उपविभागीय अधिकारी	अप्पर जिल्हाधिकारी
७	ऐपतीचा दाखला	२१	ना. तहसिलदार (रू.२ लक्ष पर्यंत)	तहसिलदार	उपविभागीय अधिकारी
			तहसिलदार (रू.२००००१ ते ८ लक्ष पर्यंत)	उपविभागीय अधिकारी	अप्पर जिल्हाधिकारी
			उपविभागीय अधिकारी (रू.८ लक्ष १ ते ४० लक्ष पर्यंत)	अप्पर जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी
			जिल्हाधिकारी (रू. ४० लक्ष वरील)	अप्पर आयुक्त	विभागीय आयुक्त

८	सांस्कृतिक कार्यक्रम परवाना	७	तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी	उपविभागीय दंडाधिकारी जिल्हा दंडाधिकारी	अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी विभागीय आयुक्त
९	अधिकार अभिलेखाची प्रमाणित प्रत	७	लिपिक/ तलाठी	नायब तहसिलदार	तहसिलदार
१०	अल्प भू-धारक दाखला	१५	तहसिलदार	उपविभागीय अधिकारी	अप्पर जिल्हाधिकारी
११	भूमीहीन शेतमजुर असल्याचा दाखला	१५	तहसिलदार	उपविभागीय अधिकारी	अप्पर जिल्हाधिकारी
१२	शेतकरी असल्याचा दाखला	१५	तहसिलदार	उपविभागीय अधिकारी	अप्पर जिल्हाधिकारी
१३	डोंगर/ दुर्गम क्षेत्रात राहत असल्याचे प्रमाणपत्र	७	तहसिलदार	उपविभागीय अधिकारी	अप्पर जिल्हाधिकारी
१४	प्रतिज्ञापत्र साक्षांकीत करणे	१	अव्वल कारकून/ नायब तहसिलदार	नायब तहसिलदार/ तहसिलदार	उपविभागीय अधिकारी
१५	उद्योजकांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४४अ च्या तरतूदीनुसार परस्पर औद्योगिक वापर सुरु करणे शक्य व्हावे त्यांकरिता आवश्यक अधिकृत माहिती तातडीने उपलब्ध करुन देणे	३०	संबंधित जिल्हयाचे अपर जिल्हाधिकारी तथा शा.नि. क्र.एनएपी-२०१५/प्र.क्र.२८/टी-१ दि.३१.०३.२०१५ अन्वये गठीत जिल्हा स्तरावरील औद्योगिक अकृषिक वापर सहाय्यभूत समितीचे अध्यक्ष	अपर जिल्हाधिकारी तथा समन्वय अधिकारी "मैत्री कक्ष"	विकास आयुक्त तथा अध्यक्ष "मैत्री कक्ष"
१६	औद्योगिक प्रयोजनार्थ जमिन खोदण्याची परवानगी (गौण खनिज उत्खनन)	३०	तहसीलदार - ५०० ब्रास पर्यंत उपविभागीय अधिकारी	अपर जिल्हाधिकारी तथा समन्वय अधिकारी "मैत्री	विकास आयुक्त तथा अध्यक्ष "मैत्री कक्ष"

			-२००० ब्रास पर्यंत जिल्हाधिकारी - २५००० ब्रास पर्यंत	कक्ष”	
१७	औद्योगिक प्रयोजनार्थ जमीन वापरण्याकामी बिगर अधिसूचित वृक्ष तोड परवानगी	३०	उपविभागीय अधिकारी संबंधित महसूल विभाग	अपर जिल्हाधिकारी तथा समन्वय अधिकारी “मैत्री कक्ष”	विकास आयुक्त तथा अध्यक्ष “मैत्री कक्ष”
१८	महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२अ (१) (अ) अन्वये भोगवाटादार वर्ग-१ या धारणा-धिकाराच्या जमिनींसंदर्भात नियोजन प्राधिकरणाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अर्जांतर्गत जमिनीचा वर्ग, जमिनीचा भोगवाटादार व त्यावरील भार इत्यादीबाबतचे विनिश्चिती प्रमाणपत्र देणे.	३०	संबंधित तहसिलदार	संबंधित उपविभागीय अधिकारी	संबंधित अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी
१९	महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२अ (१) (ब) अन्वये राज्यात अंमलात असलेले शेतजमीन व कुळवहिवाट अधिनियम, विविध वतन अधिनियम आणि महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ या अधिनियमांनुसार वाटप केलेल्या भोगवटादार वर्ग-२ या धारणा-धिकाराच्या जमिनीकरीता भोगवटा-दाराचा परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यापासून विकास परवानगी मिळविण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे.	३०	संबंधित जिल्हाधिकारी	संबंधित विभागीय आयुक्त	सचिव/प्रधान सचिव व विशेष कार्य अधिकारी (अपील व रिव्हीजन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२०	महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२अ अन्वये संबंधित व्यक्तिने प्राप्त केलेल्या विकास परवानगीच्या अनुषंगाने, अशा व्यक्तिकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे आणि कलम ४७अ मध्ये नमुद केलेल्या दराने रुपांतरण कराचा आणि त्याबद्दलच्या अकृषिक आकारणीचा भरणा केल्यावर, संबंधित व्यक्तीला विहीत नमुन्यामध्ये सनद देणे	३०	संबंधित तहसिलदार	संबंधित उप विभागीय अधिकारी	संबंधित अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी

भूमी अभिलेख विभाग

२१	**<u>नक्कल पुरविणे</u>** अ) मिळकत पत्रिका	३	१) मुख्यालय सहाय्यक/ परीरक्षण भूमापक (गावठाण) , उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय २) शिरस्तेदार/ प्रमुख लिपिक, नगर भूमापन अधिकारी कार्यालय	१) उप अधिक्षक भूमि अभिलेख २) नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख
२२	ब) मिळकत पत्रिका मुंबई उपनगर जिल्हा, क्षेत्र पडताळणी करून	३०	नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
२३	क) टिपण, क्षेत्रबुक, प्रतिबुक, शेतपुस्तक, जबाब, फाळणी, काटे फाळणी, हि. फॉ. नं. ४, आकारफोड, स्कीम उतारा, आकारबंद, गटनकाशा, मोजणी नकाशा, क.जा.प., चौकशी नोंदवही इत्यादी अभिलेख	५	१) मुख्यालय सहाय्यक/ परीरक्षण भूमापक (गावठाण) २) शिरस्तेदार/ प्रमुख लिपिक, नगर भूमापन अधिकारी कार्यालय ३) शिरस्तेदार, विशेष उपअधीक्षक भूमि अभिलेख (गावठाण/शहर मापन), ४) विशेष उपअधीक्षक भूमि अभिलेख तथा चौकशी अधिकारी	१) उप अधिक्षक भूमि अभिलेख २) नगर भूमापन अधिकारी ३) विशेष उपअधीक्षक भूमि अभिलेख (गावठाण/शहरमापन), ४) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख	१, २, व ३ जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख ४) उपसंचालक भूमि अभिलेख
२४	ड) अपील निर्णयाच्या नकला	३	१) मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय २) मुख्यालय सहायक/	१) उप अधिक्षक भूमि अभिलेख २) नगर भूमापन	१, व २, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख

			प्रमुख लिपिक/शिरस्तेदार, नगर भूमापन अधिकारी कार्यालय ३) प्रमुख लिपिक, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय ४) वरीष्ठ लिपीक, उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालय	अधिकारी ३) जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख ४) कार्यालय अधिक्षक, उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालय	३) उपसंचालक भूमि अभिलेख ४) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख (सलग्न), उपसंचालक भूमि अभिलेख
२५	**<u>अ) मोजणी प्रकरणे</u>** i) अतितातडी प्रकरणे	६०	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
२६	ii) तातडी प्रकरणे	९०	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
२७	iii) साधी प्रकरणे	१८०	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
२८	iv) अति अति तातडी प्रकरणे	१५	१. उपअधीक्षक भूमि अभिलेख २. नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
२९	**ब)** मोजणी पुर्ण झाल्यानंतर मोजणी नकाशाची "क" प्रत देणे	१५	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख

३०	**आकारफोड/कजाप तयार करणे** अ) पोटहिस्सा मोजणीनंतर परिपूर्ण प्रकरणामध्ये आकारफोड मंजूर करणे	३०	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
३१	ब) बिनशेती मोजणी प्रकरण निकाली झाल्यानंतर परिपूर्ण प्रकरणामध्ये क.जा.प. तयार करून मंजूर करणे	३०	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
३२	**फेरफार नोंदी** अ) विवादग्रस्त नसल्यास	२५	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
३३	ब) दुवा तुटलेली असल्यास फेरफाराबाबत निर्णय घेणे	९०	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
३४	क) रस्ता, रस्ता सेट बॅक, रिझर्वेशन याबाबत संबंधीत प्राधिकरणाला जागा हस्तांतरित केलेल्या प्रकरणी संबंधीतांच्या नांवे मिळकत पत्रिकेत नोंद घेणे. (प्रकरणी महानगरपालिका/ सक्षम प्राधिकारी यांनी ताबा पावती व संपुर्ण कागदपत्रासह नामांतरासाठी प्रकरण पाठविल्यास)	३०	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
३५	ड) विवादग्रस्त असल्यास	१ वर्ष	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
३६	**मिळकत पत्रिकेची पोटविभागणी करून मिळकत पत्रिका स्वतंत्र करणे** याबाबत पोटहिस्सा मोजणी पूर्ण झालेल्या दिवसापासून अ) जिल्हाधिकारी यांनी आदेशित केलेल्या क्षेत्रात तफावत येत नसल्यास पोटहिस्सा मोजणी झाल्यापासून स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करणे.	३०	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
३७	ब) जिल्हाधिकारी यांनी आदेशित केलेल्या पोटहिस्सा क्षेत्रात तफावत येत आहे. मात्र मुळ नगर भूमापनाच्या क्षेत्रात फरक नाही अशा प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी फेरमान्यता दिल्यानंतर स्वतंत्र मि. पत्रिका उघडणे.	१५	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख

३८	भूसंपादनामध्ये रस्ता, रस्ता सेट बॅक, रिझर्वेशन याबाबत शासन/ संबंधीत प्राधिकारी यांचे नांवे स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करणे. अ) ज्याठिकाणी मुळ नगर भूमापनाच्या क्षेत्रात फरक पडत नाही अशा बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्यांचा अंतिम आदेश झालेनंतर मिळकत पत्रिका स्वतंत्र तयार करणे.	३०	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
३९	ब) हस्तांतरण क्षेत्रात फरक पडत असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांच्या फेरअंतिम आदेशानंतर	३०	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
४०	दुरुस्तीसह अद्ययावत नकाशा तयार करणेबाबत (पोटहिस्सा, सामीलीकरण, भूसंपादन, रस्ता सेटबॅक इ.मुळे नकाशात होणारे बदल) सक्षम प्राधिकाऱ्याने मंजूरीचे आदेश दिल्यानंतर	३०	उपअधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख

नोंदणी व मुद्रांक विभाग

४१	दस्त नोंदणी करणे प्रकार १ - थेट प्राप्त प्रकार २- मैत्री कक्षाकडून प्राप्त संदर्भ	१	दुय्यम निबंधक	सह जिल्हा निबंधक	नोंदणी उपमहानिरीक्षक
४२	संगणकीकृत प्रणालीमध्ये दस्ताच्या सूचीची प्रमाणित नक्कल देणे.	३	दुय्यम निबंधक	सह जिल्हा निबंधक	नोंदणी उपमहानिरीक्षक
४३	दस्ताची प्रमाणित नक्कल देणे.	५	दुय्यम निबंधक	सह जिल्हा निबंधक	नोंदणी उपमहानिरीक्षक
४४	शोध उपलब्ध करणे	१	दुय्यम निबंधक	सह जिल्हा निबंधक	नोंदणी उपमहानिरीक्षक
४५	नोटीस ऑफ इंटिमेशन फाईल करून देणे.	१	दुय्यम निबंधक	सह जिल्हा निबंधक	नोंदणी उपमहानिरीक्षक
४६	मुद्रांक शुल्क भरण्याचे प्रयोजनार्थ मूल्यांकन अहवाल देणे	३	दुय्यम निबंधक	सह जिल्हा निबंधक	नोंदणी उपमहानिरीक्षक
४७	दस्त नोंदणी संदर्भात गृहभेट देणे	३	दुय्यम निबंधक	सह जिल्हा निबंधक	नोंदणी उपमहानिरीक्षक
४८	विशेष कुलमुखत्यारपत्राचे अधिप्रमाणन करून देणे	१	दुय्यम निबंधक	सह जिल्हा निबंधक	नोंदणी उपमहानिरीक्षक
४९	सह जिल्हानिबंधक कार्यालयात नोंदणी झालेल्या दस्ताची/त्या दस्ताच्या सूचीची प्रमाणित नक्कल देणे	१५	सह जिल्हा निबंधक	नोंदणी उपमहानिरीक्षक	नोंदणी महानिरीक्षक
५०	दस्त नोंदणी न केलेल्या प्रकरणांमध्ये,ई-पेमेंट पद्धतीने भरलेल्या नोंदणी फी चा परतावा	२२	सह जिल्हा निबंधक	नोंदणी उपमहानिरीक्षक	नोंदणी महानिरीक्षक
५१	मृत्युपत्राचा सीलबंद लखोटा जमा करणे,परत घेणे व उघडणे	१	सह जिल्हा निबंधक	नोंदणी उपमहानिरीक्षक	नोंदणी महानिरीक्षक

५२	विशेष विवाह कायदा,१९५४ अन्वये विवाह संपन्न करणे	नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचा कालावधी संपल्यानंतर ९० दिवसांच्या आत	विवाह अधिकारी	सह जिल्हा निबंधक	नोंदणी उपमहानिरीक्षक
५३	विवाह प्रमाणपत्राच्या प्रमाणित नकला देणे	१५	विवाह अधिकारी	सह जिल्हा निबंधक	नोंदणी उपमहानिरीक्षक
५४	इतर पद्धतीने अगोदरच झालेल्या विवाहाची विशेष कायदा, १९५४ अंतर्गत नोदणी करणे	३० दिवसांचा कालावधी संपल्यानंतर पुर्वनियोजित वेळेनूसार १ तास	विवाह अधिकारी	सह जिल्हा निबंधक	नोंदणी उपमहानिरीक्षक
५५	दस्ताचे अभिनिर्णय करणे प्रकार-१- मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे थेट दाखल अर्ज (कागदपत्रांची पूर्तता झालेपासून) (मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यांकरिता)	दिवस ४५	मुद्रांक जिल्हाधिकारी	अप्पर मुद्रांक नियंत्रक	सह नोंदणी महानिरीक्षक
	प्रकार-२- सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे थेट दाखल अर्ज (मुंबई शहर व उपनगर जिल्हयांव्यतिरिक्त)	दिवस ४५	सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी	नोंदणी उपमहानिरीक्षक	सह नोंदणी महानिरीक्षक
	प्रकार — ३- मैत्री कक्षाकडून प्राप्त (कागदपत्रांची पूर्तता झाल्यापासून) (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांकरिता)	दिवस ४५	मुद्रांक जिल्हाधिकारी	नोडल अधिकारी, मैत्री कक्ष	अध्यक्ष, मैत्री कक्ष
	प्रकार -४ मैत्री कक्षाकडून प्राप्त (कागदपत्रांची पूर्तता झाल्यापासून) (मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यांव्यतिरिक्त)	दिवस ४५	सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी	नोडल अधिकारी, मैत्री कक्ष	अध्यक्ष, मैत्री कक्ष

******

सेवा हमी कायदा अंतर्गत अद्याप अधिसूचित न केलेल्या सेवा

१	महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम, १९६१ च्या कलम २७ अन्वये वाटप केलेल्या जमीनीच्या विक्रीस सदर अधिनियमाच्या कलम २९ नुसार परवानगी देणे.
२	महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम, १९६१ च्या कलम ४७ (१)(ब) मधील तरतुदीनुसार कमाल मर्यादेपेक्षा अधिकची जमीन धारण करण्यास कृषी महाविदयालय किंवा शाळा किंवा कृषिविषयक संशोधन करत असलेल्या संस्थेस राज्य शासनाची मान्यता देणे.
३	महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम, १९६१ च्या कलम ४७ (२) (अ) नुसार विश्वस्थ व्यवस्थेने किंवा एखादया वक्फाने दिनांक २६ सप्टेंबर, १९७० पुर्वी धारण केलेल्या जमीनीस उक्त अधिनियमाच्या तरतुदीतुन वगळण्यासाठी परवानगी देणे.
४	महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम, १९६१ च्या कलम ४७ (२)(ब) नुसार कोणत्याही व्यक्तीने, अश्वपैदास क्षेत्रासाठी किंवा कोणत्याही सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेने किंवा एखादया वक्फाने पांजरपोळ किंवा गोशाळा यासाठी दिनांक २६ सप्टेंबर, १९७० पुर्वी धारण केलेल्या जमीनीस उक्त अधिनियमाच्या तरतुदीतुन वगळण्यासाठी परवानगी देणे.
५	महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम, १९६१ च्या कलम ४७ (२)(क) नुसार औदयोगिक उपक्रमास खऱ्याखुऱ्या औदयोगिक किंवा अन्य कृषीत्तर वापरासाठी कमाल मर्यादेपेक्षा अधिकची शेतजमीन धारण करण्यास परवानगी देणे.
६	महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१/२००२ अन्वये केलेली सुधारणा आणि त्या अनुषंगाने शासन परिपत्रक क्र.वतन १०९९/ प्र.क्र.२२३/ल-४, दि.९.७.२००२ अन्वये महार वतन जमिनी व्यतिरिक्त नवीन अविभाज्य शर्तीने दिलेल्या भोगवटादार वर्ग-२ च्या इनामी /वतनी जमिनी वर्ग-१ करण्याबाबतची विहीत रक्कम भरणा करुन घेणे.
७	कुळ हक्काने दिलेल्या जमिनीच्या विक्री करिता महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम-४३ अन्वये आवश्यक असलेली जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी देणे. (मराठवाडा आणि विदर्भात लागू असलेल्या संबंधित कुळकायदयातील पूर्व परवानगी)
८	कुळ हक्काने दिलेल्या जमिनीच्या विक्री करिता महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम- ३२एम चे प्रमाणपत्र प्राप्त होऊन १० वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेला असेल, अशा प्रकरणी सदर कलम ४३ खालील तरतुदीनुसार आवश्यक असलेली आकाराच्या ४० पट इतकी रक्कम भरणा करुन घेणे (मराठवाडा आणि विदर्भात लागू असलेल्या संबंधित कुळकायदयातील तरतुदीनुसार)
९	शासनाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील इमारती मधील सदनिका/गाळे विक्रीने, वारसाने, बक्षीसपत्रान्वये, इत्यादी प्रकारे हस्तांतरीत करण्यास मान्यता देणे.
१०	शासनाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील इमारती मधील अथवा सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका/ गाळे पोट-भाडयाने देण्याकरिता पूर्व परवानगी देणे, त्याकरिता आवश्यक शुल्काचा भरणा करुन घेणे.
११	शासनाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील इमारती मधील सदनिका/गाळे तारण ठेवण्यास मान्यता देणे.
१२	शासनाने कृषीक/अकृषीक प्रयोजनासाठी प्रदान केलेल्या शासकीय जमिनींची बेकायदेशीर हस्तांतरणे नियमित करण्याविषयीचे अर्ज निर्णित करणे
१३	आकारीपड जमिनी मुळ शेतकऱ्यांना परत करण्याकरिता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १८२ मधील सुधारणा आणि त्याखालील नियमानुसार प्राप्त झालेला अर्ज निर्णित करणे.
१४	प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील इमारतींच्या पुर्नविकासा करिता परवानगी देणे व आवश्यक असलेले अधिमूल्य भरुन घेणे (मुंबई शहर आणि मुंबई उपनगर वगळून)
१५	भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींच्या भाडेपट्टयाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर अशा भाडेपटटयाचे नुतनीकरण करणाचे आदेश काढणे, करारनामा करणे,

	रक्कम भरणा करुन घेणे,इत्यादी.
१६	प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील इमारतींच्या बांधकामाकरिता मुदतवाढ देणे.
१७	औद्योगिक प्रयोजनाकरिता प्रदान केलेल्या शासकीय जमिनींच्या वापरात निवासी प्रयोजनार्थ बदल करण्याकरिता परवानगी देणे, रक्कम भरणा करुन घेणे.
१८	औद्योगिक प्रयोजनाकरिता प्रदान केलेल्या शासकीय जमिनींच्या वापरात धर्मदाय प्रयोजनार्थ बदल करण्याकरिता परवानगी देणे, रक्कम भरणा करुन घेणे.
१९	खेळाचे मैदान अथवा क्रिडांगण, मोकळया जागा या प्रयोजनासाठी प्रदान केलेल्या अथवा प्रदान न केलेल्या मोकळया शासकीय जमीन इत्यादी यावर मनोरंजनाचे कार्यक्रम, प्रदर्शन, सर्कस, विविध समारंभ घेण्याकरिता परवानगी देणे, त्याकरिता आवश्यक शुल्क भरुन घेणे.
२०	मोकळया शासकीय जमिनीवर जाहिरात फलक उभारण्यास परवानगी देणे, आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुन घेणे.
२१	महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमाच्या कलम ६३ एक अ अन्वये खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी किंवा एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पा करिता खरेदी केलेल्या भोगवटादार वर्ग-२ धारणाधिकाऱ्याच्या जमिनींच्या अनुषंगाने २ टक्के अथवा ५०टक्के नजराणा रक्कम भरुन घेणे.
२२	महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमाच्या कलम ६३ एक अ अन्वये खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी किंवा एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाकरिता खरेदी केलेल्या शेत जमिनींच्या वापरासाठीचा ५ वर्षाचा कालावधी संपूष्ठात आल्यानंतर मुदतवाढ देण्यासाठी परवानगी देणे, त्या अनुषंगाने आवश्यक ती २ टक्के प्रतिवर्ष या प्रमाणे देय बिगर उपयोजन रक्कम भरणा करुन घेणे.
२३	महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमाच्या कलम ६३ एक अ अन्वये खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी किंवा एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पा करिता खरेदी केलेल्या शेत जमिनींचा विकास आराखडा अथवा प्रादेशिक योजना या मधील आरक्षणाशी सुसंगत अन्य बिगर कृषी प्रयोजनार्थ वापर करण्यास अनुमती देणे व आवश्यक शुल्काचा भरणा करुन घेणे.
२४	महाराष्ट्र जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रिकरण करण्याबाबतचा अधिनियम अंतर्गत तुकडेबंदी असतांना झालेल्या जमिनींच्या तुकडयांच्या नियमितीकरणाची प्रकरणे नियमानुकुल करणे.
२५	महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२ ब अन्वये भोगवटादार वर्ग-१ किंवा वर्ग-२ या धारणाधिकाराच्या जमीनींसंदर्भात संबंधित अर्जदाराकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जांतर्गत जमिनीचा विकास योजनेत दर्शविलेल्या वापराच्या आधारे मानीव अकृषिक रुपांतरणाबद्दल देय असलेला नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी, रुपांतरण कर आणि जमिनीची अकृषिक आकारणी निर्धारित करुन भरणा करण्यासाठी अर्जदाराला कळविणे.
२६	महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२ ब अन्वये भोगवटादार वर्ग-१ किंवा वर्ग-२ या धारणाधिकाराच्या जमिनींसंदर्भात संबंधित अर्जदाराने देय असलेल्या रकमेचा भरणा केल्यानंतर त्यास विहीत नमुन्यात सनद देणे.
२७	महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२ क अन्वये प्रारुप किंवा अंतिम प्रादेशिक योजना क्षेत्रात भोगवटादार वर्ग-१ किंवा वर्ग-२ या धारणाधिकाराच्या जमिनींसंदर्भात संबंधित अर्जदाराकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जांतर्गत जमिनीसाठी विकास परवानगी मिळाल्यावर मानीव अकृषिक रुपांतरणाबद्दल देय असलेला नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी, रुपांतरण कर आणि जमिनीची अकृषिक आकारणी निर्धारित करुन भरणा करण्यासाठी अर्जदाराला कळविणे.
२८	महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२ ड अन्वये भोगवटादार वर्ग-१ किंवा वर्ग-२ या धारणाधिकाराच्या गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या हद्दीपासून २०० मीटरच्या आतील जमीनींसंदर्भात संबंधित अर्जदाराकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जांतर्गत जमिनीचा प्रारुप किंवा अंतिम प्रादेशिक योजनेत दर्शविलेल्या वापराच्या आधारे मानीव अकृषिक रुपांतरणाबद्दल देय असलेला नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी, रुपांतरण कर आणि जमिनीची अकृषिक आकारणी निर्धारित करुन भरणा करण्यासाठी अर्जदाराला कळविणे.

२९	महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३६ अन्वये अनुसूचित जमातीच्या व्यक्तींच्या जमिनी अनुसूचित जमातीच्या इतर व्यक्तींना हस्तांतरीत करावयाचा परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त झाल्यानंतर त्यास मंजूरी देणे.
३०	महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३६ अ अन्वये अनुसूचित जमातीच्या व्यक्तींच्या जमिनी बिगर अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना हस्तांतरीत करण्यास शासनाची पूर्वमान्यता प्राप्त करुन जिल्हाधिकाऱ्याने त्यास मंजूरी देणे.
३१	(अ) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.जमीन-२४९९/ प्र.क्र.१२५/ज-८, दि.२३.१२.२०१५ मधील तरतुदींनुसार नागपूर व अमरावती विभागातील नझूल जमिनीच्या भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण करण्यासंदर्भात भाडेपट्टाधारकांकडून नुतनीकरण करण्याबाबतचे अर्ज प्राप्त झाल्यास, त्याबाबतची शहानिशा करून नियमांनुसार सुधारित भाडेपट्ट्याचा दर किती येतो; व सदर दर कोणत्या बाबींच्या आधारे निश्चित केला आहे ह्या स्पष्टतेसह भरणा करावयाच्या रकमेची परिगणना करून सदर रक्कम भरण्याबाबत संबंधित भाडेपट्टाधारकास कळविणे.
	(ब) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.जमीन-२४९९/ प्र.क्र.१२५/ज-८, दि.२३.१२.२०१५ नुसार नझूल भाडेपट्ट्यांच्या नुतनीकरणासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी कळविलेल्या रकमेचा भरणा संबंधित भाडेपट्टाधारकाने केल्यानंतर सदर भाडेपट्ट्याचे नुतनीकरण करणे.
३२	(अ) अमरावती व नागपूर विभागातील नझूल भाडेपट्ट्यांच्या संदर्भात भाडेपट्ट्याने अथवा यथास्थिती 'ब' सत्ताप्रकाराने धारण केलेल्या जमिनीचे विनापरवानगी हस्तांतरण करण्यात आले असल्यास, सदर हस्तांतरण नियमानुकूल करण्यासाठी संबंधित भाडेपट्टाधारकांकडून अर्ज प्राप्त झाल्यास, अनधिकृत हस्तांतरण नियमानुकूल करण्यासाठी अनर्जित रकमेची परिगणना करून सदर रक्कम भरण्याबाबत संबंधित भाडेपट्टाधारकास कळविणे.
	(ब) नझूल भाडेपट्ट्याच्या संदर्भात अनधिकृत हस्तांतरण नियमानुकूल करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी निर्धारित केलेल्या अनर्जित रकमेचा संबंधित नझूल भाडेपट्टाधारकाने भरणा केल्यानंतर अनधिकृत हस्तांतरण नियमानुकूल करणे.
३३	(अ) अमरावती व नागपूर विभागातील नझूल भाडेपट्ट्यांच्या संदर्भात भाडेपट्ट्याने अथवा यथास्थिती 'ब' सत्ताप्रकाराने धारण केलेल्या जमिनीचा अनधिकृत वापरातील बदल करण्यात आला असल्यास, सदर अनधिकृत वापरातील बदल नियमानुकूल करण्यासाठी संबंधित भाडेपट्टाधारकांकडून अर्ज प्राप्त झाल्यास, अनधिकृत वापरातील बदल नियमानुकूल करण्यासाठी अनर्जित रकमेची परिगणना करून सदर रक्कम भरण्याबाबत संबंधित भाडेपट्टाधारकास कळविणे.
	(ब) नझूल भाडेपट्ट्याच्या संदर्भात अनधिकृत वापरातील बदल नियमानुकूल करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी निर्धारित केलेल्या अनर्जित रकमेचा संबंधित नझूल भाडेपट्टाधारकाने भरणा केल्यानंतर अनधिकृत वापरातील बदल नियमानुकूल करणे.
३४	(अ) अमरावती व नागपूर विभागातील नझूल भाडेपट्ट्यांच्या संदर्भात भाडेपट्ट्याने अथवा यथास्थिती 'ब' सत्ताप्रकाराने धारण केलेल्या जमिनीचे हस्तांतरण करण्याकरिता परवानगी देण्यासाठी संबंधित भाडेपट्टाधारकांकडून अर्ज प्राप्त झाल्यास, जमिनीचे हस्तांतरण करण्यासाठी अनर्जित रकमेची परिगणना करून सदर रक्कम भरण्याबाबत संबंधित भाडेपट्टाधारकास कळविणे.
	(ब) नझूल भाडेपट्ट्याच्या संदर्भात जमिनीचे हस्तांतरण करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी निर्धारित केलेल्या अनर्जित रकमेचा संबंधित नझूल भाडेपट्टाधारकाने भरणा केल्यानंतर हस्तांतरण करण्यास परवानगी देणे.

३५	(अ) अमरावती व नागपूर विभागातील नझूल भाडेपट्ट्यांच्या संदर्भात भाडेपट्ट्याने अथवा यथास्थिती 'ब' सत्ताप्रकाराने धारण केलेल्या जमिनीच्या वापरात बदल करण्याकरिता परवानगी देण्यासाठी संबंधित भाडेपट्टाधारकांकडून अर्ज प्राप्त झाल्यास, जमिनीच्या वापरात बदल करण्यासाठी अनर्जित रकमेची परिगणना करून सदर रक्कम भरण्याबाबत संबंधित भाडेपट्टाधारकास कळविणे.
	(ब) नझूल भाडेपट्ट्याच्या संदर्भात जमिनीचे हस्तांतरण करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी निर्धारित केलेल्या अनर्जित रकमेचा संबंधित नझूल भाडेपट्टाधारकाने भरणा केल्यानंतर जमिनीच्या वापरात बदल करण्यास परवानगी देणे.
३६	ई-रजिस्ट्रेशन (लिव्ह ॲण्ड लायसन्स व विकसकाचे (बिल्डर) प्रथम विक्री करारनामा)
३७	मुद्रांक शुल्काचा परतावा देणे प्रकार-१ मुंबई विभाग
	प्रकार-२ उर्वरित विभागात
३८	दस्त दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीस सादर करणेसाठी किंवा कबुलीजबाब देण्यासाठी झालेला विलंब क्षमापित करणे.
३९	दस्त नोंदणी नाकारण्याच्या आदेशाविरुध्द अपील

******